दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ८७९/२०२२<br>दत्ता व ईतर वि. बाबु व ईतर

**<u>वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ३९ खालील आदेश</u>**

प्रस्तूतचा अर्ज वादीने *दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०६ नियम १७* अनुसार अर्जामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२**. वादीने कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.३ उमाकांत पिता प्रकाशराव सोमवंशी यांचे व वादींमध्ये आपसात तडजोड झाली आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात तडजोडपत्र (निशाणी ३६) दाखल केले आहे. त्यामुळे वादी प्रतिवादी क्र.३ उमाकांत पिता प्रकाशराव सोमवंशी यांच्याविरुध्द प्रकरण चालवु इच्छीत नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.३ उमाकांत पिता प्रकाशराव सोमवंशी हे नाव खोडायचे असल्याने सदरचा अर्ज मुळअर्जात दुरूस्ती करण्याकरीता दाखल केला आहे. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादीने केली आहे.

**०३**. प्रतिवादींना पुरेशी संधी देऊनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही. सबब सदरचा अर्ज प्रतिवादींच्या 'म्हणणेविना' चालविण्यात आला.

**०४**. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदारांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०५**. वादींनी नमुद केलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही अथवा त्यामुळे प्रतिवादींच्या हक्कांना बाधा येणार नाही. म्हणून अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज **<u>नि.क्र.३९</u>** मंजूर करण्यात येतो.

२. वादीने वादपत्रात प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांत करुन अर्जाची एकत्रीत प्रत व हुकूमनाम्यासाठी अर्जाची दुय्यम प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.06.09 16:08:09 +0530

**( श्री. आवटे पी. पी.)**

दिनांकः– ०९/०६/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.

ठिकाण – औसा. जिल्हा लातूर.